फिर्यादी कडील।

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहिल्यानगर **P.S.(ठाणे):** तोफखाना
**Year (वर्ष):** 2025
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 1097
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**21/11/2025 02:10

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 18/11/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 20/11/2025
**Time From (वेळेपासून):** 12:21 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:26 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 21/11/2025 **Time (वेळ):** 01:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 002
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 21/11/2025 01:46 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** अहिल्यानगर शहरातील डी मार्ट सम,पंचायत समिती कार्यालय पारनेर य

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अजित बाळकृष्ण त्रिपुटे
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 31/07/1972
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस उपअधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर,तोफखाना, अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस उपअधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर,तोफखाना, अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-8329701344

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विलास नवनाथ चौधरी | | | 1. कृष्णकुंज रोहौसिंग घर नं 3,, लेखानगर, पाईपलाईनरोड, अहिल्यानगर ,तोफखाना, अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | दिनकर दत्तात्रय मगर | | | 1. खांडगाव, ता पाथर्डी, अहिल्यानगर ,तोफखाना, अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 | अजय विठ्ठल जगदाळे | | | 1. ता पारनेर,अहिल्यानगर , तोफखाना,अहिल्यानगर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 65,600/ रुपये लाचेची मागणी | 65,600.00 |

10 **Total value of property (In Rs/-) (चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

65,600.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि. 21/11/2025

मी अजित बाळकृष्ण त्रिपुटे, वय 50 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर, मो.नं. 8329701344

समक्ष सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर येथे पोलीस उपअधीक्षक या पदावर दि. 27/08/2024 रोजी पासुन कार्यरत आहे. दि.17/11/2025 रोजी आम्ही ला.प्र.वि. कार्यालयात हजर असताना तक्रारदार श्री. अर्जुन बाळु कांदळकर यांनी आमचेषी संपर्क करून त्यांची लोकसेवकाविरोधात लाचमागणीची तक्रार असल्याचे कळविले व ते लोकसेवक यांस दि. 18/11/2025 रोजी भेटण्याचे ठिकाणाबाबत विचारणा करणार असल्याचे कळविले. आम्ही उप आयुक्त, वस्तु व सेवा कर विभाग, अहिल्यानगर यांना पत्र देवुन दोन पंच साक्षीदार यांना दि. 18/11/2025 रोजी सकाळी 09/00 वा. ला.प्र.वि. कार्यालयात उपलब्ध करून देणेबाबत कळविले.

दि. 18/11/2025 रोजी वस्तु व सेवाकर विभागाचे दोन्ही पंच साक्षीदार ला.प्र.वि.कार्यालयात हजर झाल्यानंतर आम्ही त्यांना एका तक्रारदार यांची लोकसेवकाविरूध्द लाचमागणीची तक्रार असुन त्याप्रमाणे कारवाई करायची आहे, सदर कारवाईमध्ये आपण पंच म्हणुन काम करण्यास तयार आहात काय याबाबत पंचांची संमती विचारली असता पंचांनी त्यास संमती दिली. तसेच आम्ही कार्यालयात हजर असलेले पोहेकॉ शिंदे, पोकॉ निमसे, पोकॉ कराड, चापोहेकॉ हारूण शेख यांना आमचे कार्यालयीन कक्षात बोलवुन दोन्ही पंचांची सापळा पथकाशी ओळख करून दिली. त्यानंतर थोडया वेळाने तक्रारदार यांनी आम्हास फोनव्दारे संपर्क करून ते लोकसेवक यांची अहिल्यानगर षहरात भेट घेणार असल्याचे कळविले. त्याप्रमाणे आम्ही तक्रारदार यांना अहिल्यानगर येथील सुरक्षित ठिकाणी हजर राहणेबाबत कळविले. आम्ही सापळा पथकास सापळा कारवाईकामी आवश्यक असलेले सर्व साहित्य सोबत घेण्यास सांगुन आम्ही, दोन्ही पंच, सापळा पथकातील कर्मचारी असे सर्व साहित्यानिशी शासकिय वाहन क्र. एम एच 16 सीव्ही 0919 या वाहनाने ला.प्र.वि.कार्यालयातुन 10/45 वा. निघुन 11/00 वा.अहिल्यानगर येथील सुरक्षित ठिकाणी पोहोचलो. त्यानंतर सदर ठिकाणी तक्रारदार हे त्यांचेकडील चारचाकी वाहन क्र. एम एच 17 बीएक्स 4007 या वाहनाने आम्ही थांबलो त्या ठिकाणी आले. आमचे सुचनेवरून दोन्ही पंचांनी तक्रारदार यांना त्यांचे नाव पत्ता व तक्रार विचारली असता तक्रारदार यांनी त्यांचे पुर्ण नाव श्री. अर्जुन बाळु कांदळकर, वय 24 वर्षे, धंदा कॉन्ट्रॅक्टर, रा. तळेगाव दिघे, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर असे सांगुन त्यांची तक्रार सांगितली की, " मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहण्यास आहे. माझे जवळचे नातेवाईक (माझ्या आइचे आतेभाऊ) श्री. जालिंदर नबाजी बढे, रा. डाउच बु., ता.कोपरगाव यांचे नावे जय विरभद्र अर्थमुवर्स नावाची फर्म असुन सदर फर्मची नोंदणी उदयम

आधारला करण्यात आलेली आहे. त्याचा नोंदणी क्रमांक एम एच 01 ई 0015722 असा आहे. सदर फर्मची सर्व कामे मी पाहतो. या फर्मव्दारे आम्ही रोजगार हमी योजनेअंतर्गत रस्त्याची कामे तसेच खाजगी लॅण्ड डेव्हलपिंगची कामे करतो. मातोश्री ग्रामसमृध्दी पाणंद रस्ते योजना या योजनेतुन मौजे कारेगाव, ता.पारनेर येथील कारेगाव ते वाघोबा रस्ता खडीकरण व मजबुतीकरण शेत पाणंद रस्ता तयार करणे या कामास पंचायत समिती, पारनेर येथुन प्रशासकिय मान्यता मिळाली होती. सदर रस्त्यास मुरुम, खडी पुरविण्याचे ई टेंडर आमचे जय विरभद्र अर्थमुवर्स या फर्मने दि. 01/07/2025 रोजी ऑनलाईन पध्दतीने भरले होते. त्याप्रमाणे सदरचे काम आमचे फर्मला मिळाले होते. सदरचे पाणंद रस्त्यास मटेरिअल पुरविण्याचे काम आमचे फर्मने पुर्ण केले आहे व कामाची एकुण 05 बिले आम्ही सरपंच, ग्रामसेवक कारेगाव, ता.पारनेर यांना सादर केली आहेत. त्याच्या रक्कमा अनुक्रमे 1,46,737/-रू., 1,66,103/-रु, 3,72,907/-रु, 7,14,764/-रु, 39,705/-रु. अशी एकुण 14,40,216/-रु.ची बिले आम्ही सादर केली आहेत. आमचे फर्मने केलेल्या कामाची मोजमाप पुस्तिका पंचायत समिती पारनेर येथील रोजगार हमी योजनेचे काम पाहणारे अभियंता श्री. विलास चैधरी यांनी तयार केली आहे. सदर मोजमाप पुस्तिकेनुसार आम्ही केलेल्या कामाची बिले तयार करून ते मंजुरीकरीता पाठविण्याचे काम अभियंता श्री. विलास चौधरी यांचेकडे आहे. मी दिनांक 17/11/2025 रोजी अभियंता श्री. विलास चौधरी यांना फोन करून कामाच्या बिलाच्या मंजुरीबाबत विचारणा केली असता त्यांनी '' तुम्हाला माझा प्रोटोकॉल पुर्ण करावा लागेल, काहीतरी रक्कम, टक्केवारी मला दयावी लागेल, तरच तुमच्या कामाची बिले तयार करून मंजुरीला पाठविले जातील, नाहीतर बिले लवकर मंजुर होणार नाहीत, तुम्ही उदया येवुन मला भेटा '' असे म्हणुन माझेकडे लाचेची मागणी केली. बिले तयार करून मंजुरीला पाठविण्याकरीता पैशाची आवश्यकता नाही याबाबत मला माहिती आहे. श्री. चौधरी हे माझेकडे लाचेची मागणी करत असुन मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नाही. माझेत व चौधरी साहेब यांचेत झालेल्या संभाशणाची माहिती मी माझे नातेवाईक व जय विरभद्र अर्थमुवर्सचे प्रोप्रायटर श्री. जालिंदर बढे यांना सांगितली. त्यावर त्यांनी देखील अभियंता चैधरी यांस लाच देण्याची त्यांची ईच्छा नसल्याचे मला सांगितले व फर्मचे कामकाज मी पाहत असल्याने चैधरी यांचेविरूध्द लाच मागणीबाबतची तक्रार देण्याकरीता त्यांनी मला पुर्णपणे संमती दिली आहे. तसेच संमतीपत्र त्यांनी दिले आहे. आम्हा दोघांचीही अभियंता चौधरी यांना लाच देण्याची ईच्छा नाही. मी आज रोजी सकाळी श्री. चौधरी साहेब यांना फोन केला असता त्यांनी मला ते अहिल्यानगर येथे येणार असल्याचे सांगितले आहे. त्याप्रमाणे मी श्री. चौधरी साहेबांची अहिल्यानगर येथे भेट घेणार आहे व त्यांचेशी आमचे फर्मने केलेल्या कामाच्या बिलाच्या मंजुरीबाबत चर्चा करणार आहे. त्यावेळी श्री. चौधरी यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेविरूध्द कायदेशीर कारवाई करावी. माझ्यात व अभियंता श्री. चौधरी, पंचायत समिती, पारनेर यांच्यात कोणत्याही प्रकारचा आर्थिक देण्याघेण्याचा व्यवहार नाही. तसेच कोणताही वैरभाव नाही. चौधरी साहेब यांनी लाचेची मागणी केल्यास सदर रक्कम मी माझ्या बचतीतुन हजर करील. सोबत- जय विरभद्र अर्थमुवर्स फर्मचे नोंदणीचे कागदपत्र, सदर कामाची प्रशासकिय मान्यतेचे कागदपत्र व ई टेंडर, मटेरिअल पुरविलेबाबतची बिले छायांकित प्रती हजर करत आहे.'' अशी तक्रार सांगितली. आम्ही तक्रारदार यांची तक्रार त्यांचे स्वहस्ताक्षरात लिहुन घेतली. सदर तक्रारीवर तक्रारदार, आम्ही व दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली.

त्यानंतर तक्रारदार श्री. कांदळकर यांचे तक्रारीप्रमाणे लोकसेवक चौधरी यांची लाचमागणी पडताळणी करण्याचे ठरले. आम्ही लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हॉईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवुन त्याच्या वापराबाबत तक्रारदार श्री. कांदळकर व दोन्ही पंचांना माहिती समजावुन सांगितली. आमचे सुचनेप्रमाणे सापळा पथकातील पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये एक नविन मेमरीकार्ड घालुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करून त्या मेमरीकार्डमध्ये काहीही रेकॉर्ड नसल्याबाबत तक्रारदार व दोन्ही पंचांची खात्री करून दिली. त्यानंतर पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून त्यामध्ये तक्रारदार श्री. कांदळकर यांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करणेकामी आम्ही, दोन्ही पंच व तक्रारदार श्री. कांदळकर असे उपस्थित असलेबाबत निवेदन रेकॉर्ड केले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना लोकसेवक चौधरी कोठे भेटतील याबाबत विचारले असता त्यांनी लोकसेवक चौधरी हे अहिल्यानगर शहरातील डी मार्ट जवळ भेटणार असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाईबाबत तक्रारदार व पंच नं. 1 यांना सुचना समजावुन सांगितल्या. पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून ते तक्रारदार श्री. कांदळकर यांचे गळयात कोणास दिसणार अशा प्रकारे अडकवुन दिला. आम्ही दिल्या सुचने प्रमाणे तक्रारदार हे पंच नं. 1 यांचेसह तक्रारदार कांदळकर यांच्या चारचाकी वाहनाने लोकसेवक चौधरी यांची भेट घेण्याकरीता डी मार्ट येथे जाण्याकरीता 12/21 वाजता रवाना केले. त्यानंतर 12/49 वाजेच्या सुमारास तक्रारदार व पंच नं. 1 आम्ही थांबलो त्याठिकाणी परत आले. पोकॉ निमसे यांनी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केले. आम्ही पंच नं. 1 यांना लोकसेवक चौधरी यांची भेट घेण्याकरीता रवाना केल्यापासुन परत येई पर्यंत घडलेल्या घटने विशयी पंच नं. 2 यांचे समक्ष विचारले असता त्यांनी सांगितले की, मी

व तक्रारदार असे रवाना होउन डी मार्ट येथे पोहोचलो तेथे रोडवर चारचाकी वाहनाच्या बाजुला हजर असलेल्या एका इसमास तक्रारदार यांनी मला वाटल शॉपिंग करता की काय? असे विचारले असता सदर इसमाने कलेक्टर ऑफिसला होतो असे म्हणाले त्यावर सदर इसम हे लोकसेवक चैधरी असल्याचे मला समजले. तक्रारदार व लोकसेवक यांच्यात तक्रारदार यांच्या कामाचे बिल मंजुरी बाबत चर्चा झाली. सदर चर्चे दरम्यान लोकसेवक चौधरी यांनी तक्रारदार यांचे कामाचे बिल मंजुरी करीता पाठविण्यासाठी दोन टक्के डेप्युटी इंजिनिअर करीता, दोन टक्के बीडीओ करीता, पाच अन एक असे सहा हजार वरतीचे असे मिळुन कामाचे एकुण बिलाचे टक्केवारी प्रमाणे एकुण 65,600/- रुपये लाचेच्या रकमेची मागणी केली. त्यावर तक्रारदार यांनी किती कॅश अॅडजस्ट होतो ते पाहतो असे म्हणाले असता, लोकसेवक चौधरी यांनी मी आता पारनेरला चाललो तुमच कस होत उदया किंवा शनिवारी आणा, दोन दिवसात बिल करुन डिमांड करुन देतो तुम्हाला असे म्हणाले. थोडावेळ चर्चा करुन लोकसेवक चौधरी तेथुन निघुन गेले. त्यानंतर मी व तक्रारदार तेथुन निघुन आपण थांबले ठिकाणी परत आलो, अशी हकिगत सांगितली. त्यानंतर आम्ही तक्रादार यांना घडलेल्या हकिगती विषयी विचारले असता त्यांनी पंच नं. 1 यांनी सांगितलेल्या हकिगतीशी मिळती जुळती हकिगत सांगितली. त्यानंतर आम्ही व दोन्ही पंचानी व्हॉईस रेकॉर्डर मधील तक्रारदार व लोकसेवक चौधरी यांचेतील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले असता, लोकसेवक चौधरी यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांनी केलेल्या कामाचे बिले तयार करुन मंजुरी करीता पाठविण्यासाठी डेप्युटी इंजिनिअर व बीडीओ यांचेकरीता कामाचे बिलाचे टक्केवारी प्रमाणे एकुण 65,600/- रुपये लाचेच्या रकमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. सदर कारवाईचा सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

लोकसेवक चौधरी यांनी डेप्युटी इंजिनिअर, बीडीओ यांचेकरीता पैशाची मागणी केलेली असल्याने, डेप्युटी इंजिनिअर, बीडीओ यांचे विरुध्द दि.19/11/2025 रोजी पंचायत समिती कार्यालय पारनेर येथे लाचमागणी पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरले. आम्ही तक्रारदार यांना उदईक रोजी पारनेर येथे सुरक्षीत ठिकाणी हजर राहणे बाबत व गोपनियेतच्या सुचना दिल्या. सदर कारवाईचा सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

दिनांक 19/11/2025 रोजी आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथक सर्व साहित्यानिशी पारनेर येथे सुरक्षीत ठिकाणी ठिकाणी पोहोचलो. थोडया वेळाने तक्रारदार तेथे त्यांचे चारचाकी वाहनाने पोहचले. आम्ही तक्रारदार व पंच यांना लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाच्या कार्यवाही बाबत सुचना समजावुन सांगितल्या. पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये एक नविन मेमरीकार्ड घालुन ते व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार यांचे गळयात अडकविले. तक्रारदार व पंच नं. 1 यांना लोकसेवक चौधरी यांची भेट घेवुन त्यांच्या मार्फतीने डेप्युटी इंजिनिअर, बीडीओ यांची भेट घेण्यासाठी पंचायत समिती पारनेर येथे तक्रारदार यांच्या चारचाकी वाहनाने 12/16 वाजता रवाना केले. त्यानंतर 12/59 वाजेच्या सुमारास तक्रारदार व पंच नं. 1 आम्ही थांबलो त्याठिकाणी परत आले. पोकॉ निमसे यांनी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केले. आम्ही पंच नं. 1 यांना रवाना केल्यापासुन परत येई पर्यत घडलेल्या घटने विषयी पंच नं. 2 यांचे समक्ष विचारले असता, त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे रवाना होउन पंचायत समिती कार्यालय पारनेर येथे पोहोचलो तेथे तक्रारद तक्रारदार यांना लोकसेवक चौधरी भेटले त्यांचे मध्ये तक्रारदार यांचे बिलाचे संदर्भात चर्चा झाली तसेच लोकसेवक चौधरी यांनी तक्रारदार यांना तुम्ही पेमेंट आणले का असे विचारले असता, त्यावर तक्रारदार यांनी सोबत नाही असे म्हणाले. तसेच डेप्युटी इंजिनिअर साहेब व बीडीओ साहेब हे कार्यालयात हजर नसल्याची व त्यांची कार्यालयात परत येण्याची वेळ निश्चीत माहित नसल्याने मी व तक्रारदार तेथुन निघुन आपण थांबले ठिकाणी परत आलो अषी हकिगत सांगितली. त्यानंतर आम्ही तक्रादार यांना घडलेल्या हकिगती विषयी विचारले असता त्यांनी पंच नं. 1 यांनी सांगितलेल्या हकिगतीशी मिळती जुळती हकिगत सांगितली. त्यानंतर आम्ही व दोन्ही पंचानी व्हॉईस रेकॉर्डर मधील तक्रारदार व लोकसेवक चौधरी यांचेतील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले असता, त्यामध्ये पंच नं. 1 व तक्रारदार यांनी वर सांगितलेल्या हकिगती प्रमाणे संभाषण असल्याची खात्री झाली. तक्रारदार यांनी कळविले की, लोकसेवक चौधरी यांनी दिनांक 18/11/2025 रोजी व आजच्या भेटी दरम्यान पैषाची मागणी करुन ती रक्कम आणली का अषी विचारणा केली आहे. त्यामुळे उदईक दिनांक 20/11/2025 रोजी मी लोकसेवक चैधरी यांचे मागणी केलेली लाचेची रक्कम रक्कम सोबत घेवुन न गेल्यास त्यांना माझे बाबत शंका निर्माण होवुन ते लाच रक्कम स्विकारणार नाहीत असे कळविल्याने दिनांक 20/11/2025 रोजी तक्रारदार यांना लोकसेवक चौधरी यांची भेट घेण्या करीता लाचेच्या रक्कमेसह पाठविण्याचे व चौधरी यांनी डेप्युटी इंजिनिअर, बीडीओ यांची भेट घालुन दिल्यास त्यांचे विरुध्द लाचमागणी पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरले. आम्ही तक्रारदार यांना उदईक दि. 20/11/2025 रोजी पारनेर येथे सुरक्षीत ठिकाणी लाचेच्या रक्कमेसह हजर राहणे बाबत तसेच गोपनियेतच्या सुचना दिल्या. सदर कारवाईचा सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

दिनांक 20/11/2025 रोजी आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथक सर्व साहित्यानिशी पारनेर येथे

सुरक्षीत ठिकाणी ठिकाणी पोहोचलो. थोडया वेळाने तक्रारदार तेथे त्यांचे चारचाकी वाहनाने पोहचले. आम्ही तक्रारदार यांना लाचेची रक्कम हजर करण्यास कळविले असता, त्यांनी त्यांचे बचतीतुन 65,600/- रक्कम त्यात 500 रुपये दराच्या 131 व 100 रुपये दराची एक अशा भारतीय चलनी नोटा हजर केल्या. सदर नोटांचे नंबर को-या कागदावर लिहण्यात आले. तो कागद पंच नं. 2 यांचे कडे देण्यात आला. आम्ही सदर सापळा कारवाईमध्ये अँन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हॉयलेट दिवा यांचे गुणधर्माबाबत माहिती देवुन त्याबाबतचे प्रात्यक्षिक पोहेकॉ शिंदे यांनी करुन दाखविले. तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांना अँन्थ्रासिन पावडर लावण्यात आली. सदर लाच रक्कम तक्रारदार यांचेकडे वाहनामध्ये ठेवण्या करीत दिली. त्यानंतर आम्ही तक्रारदार, दोन्ही पंचाना व सापळा पथकास आवश्यक त्या सुचना दिल्या व तक्रारदार यांना कळविले की, त्यांनी पंचायत समिती येथे जावुन लोकसेवक चौधरी यांची भेट घेवुन त्यांना बीडीओ व डेप्युटी इंजिनिअर यांची भेट घालुन देणे बाबत विनंती करावी त्यांनी भेट घालुन दिल्यास बीडीओ व डेप्युटी इंजिनिअर यांचेशी त्यांचे कामा संदर्भाने चर्चा करावी तसेच लोकसेवक चौधरी यांनी भेट घालुन न देता लाचेची रकमेची मागणी केल्यास त्यांना लाचेची रक्कम वाहनामध्ये ठेवलेली आहे असे सांगुन वाहनात ठेवलेली रक्कम त्यांना दयावी अशा सुचना दिल्या तसेच लाच स्विकारले नंतरचा इशारा ठरवुन देण्यात आला. पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये एक नविन मेमरीकार्ड घालुन ते व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार यांचे गळयात अडकविले. तक्रारदार व पंच नं. 1 यांना लोकसेवक चौधरी यांची भेट घेवुन त्यांच्या मार्फतीने डेप्युटी इंजिनिअर, बीडीओ यांची भेट घेण्यासाठी पंचायत समिती पारनेर येथे तक्रारदार यांच्या चारचाकी वाहनाने 12/06 वाजता रवाना केले. त्यांचे पाठोपाठ सापळा पथक पंचायत समिती येथे रवाना होवुन पंचायत समिती कार्यालयाचे आजुबाजुस सापळा लावुन थांबलो. सापळा पथक आल्याची खात्री झाल्यानंतर तक्रारदार व पंच नं. 1 असे वाहनातुन उतरुन पंचायत समिती कार्यालयात गेले. थोडयावेळाने तक्रारदार यांचे सोबत एक इसम व पंच नं. 1 असे तक्रारदार यांचे वाहनापर्यंत आले. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे वाहनाचा डावीकडील दरवाजा उघडुन वाहनामध्ये ठेवलेली लाचेची रक्कम काढुन सदर इसमाकडे दिली व लाच स्विकारले बाबतचा पुर्व नियोजीत इशारा 12/26 वाजता केला. लागलीच आम्ही पंच नं. 2 व सापळा पथकासह जावुन लाच रक्कम स्विकारणा-या इसमास ताब्यात घेतले. आम्ही सदर इसमास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव दिनकर दत्तात्रय मगर, पद तांत्रीय सहायक (कंत्राटी) पंचायत समिती पारनेर असे सांगितले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना लोकसेवक चौधरी यांचे बाबत विचारले असता त्यांनी चौधरी हे पंचायत समिती कार्यालयात असुन त्यांचे सांगण्यावरुन दिनकर मगर यांनी लाच रक्कम स्विकारली आहे. त्यांनतर तक्रारदार यांना सोबत घेवुन सापळा पथकाच्या मदतीने आम्ही पंचायत समिती कार्यालयातुन लोकसेवक चौधरी यांना ताब्यात घेवुन येवुन लोकसेवक चौधरी व लोकसेवक मगर यांना शासकिय वाहनात बसविले. पंच नं. 2 करवी सदर लाचेच्या नोटा मगर यांचेकडुन ताब्यात घेवुन सदर नोटांच्या नंबरची खात्री करण्यात आली.

त्यानंतर लोकसेवक चौधरी यांचेकडे त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव विलास नवनाथ चौधरी, वय 31 वर्षे, पद तांत्रीक सहायक(कंत्राटी), पंचायत समिती पारनेर असे सांगितले. त्यावेळी लोकसेवक चौधरी यांनी कळविले की, मी सदरची लाचेची रक्कम बीडीओ सोनकुसळे साहेब व डेप्युटी इंजिनिअर जगदाळे साहेब यांचेकरीता मागणी केली आहे. या रक्कमेषी माझा काहीच संबध नाही. मी सोनकुसळे व जगदाळे साहेब यांना फोन करुन तुमची खात्री करुन देतो असे म्हणाले त्यावेळी आमचे सुचने वरुन पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नविन मेमरी कार्ड टाकले. लोकसेवक चौधरी यांनी त्यांचे मोबईल वरुन स्पिकर ऑन करुन बीडीओ सोनकुसळे यांचे मोबाईलबर त्यांना तिन वेळा फोन केला असता, बीडीओ सोनकुसळे यांनी मी मिटिंग मध्ये आहे, मिटिंग चालु आहे असे म्हणुन फोन कट केला. त्यानंतर लोकसेवक चौधरी यांनी त्यांचे मोबईल वरुन स्पिकर ऑन करुन डेप्युटी इंजिनिअर जगदाळे यांना फोन करुन कांदळकर पैसे घेवुन आला होता, बील होत एक असे म्हणाले असता, जगदाळे यांनी घे ना मग तुझाकड कोणत्या याच होत, सहया झालेल्या आहेत का, येणार आहे मी दुपारी तुझाकडे घेवुन ठेव असे म्हणाले आहेत. लोकसेवक चौधरी यांचे बीडीओ सोनकुसळे व डेप्युटी इंजिनिअर जगदाळे यांचेसोबत फोनवरील संभाषण पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड केले. सदर संभाशणावरुन डेप्युटी इंजिनिअर जगदाळे यांनी लोकसेवक चौधरी यांना लाच रक्कम स्विकारण्यास प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर आम्ही शासकिय वाहनात लोकसेवक मगर यांनी स्विकारलेल्या लाचेच्या नोटांची, मगर यांच्या हात व कपडयांची अंधारात अल्ट्राव्हॉयलेट दिव्याच्या प्रकाशात तपासणी केली असता, मगर यांच्या डाव्या हाताच्या तळहातास व बोटांच्या पे-यांना अँन्थ्रासिन पावडरची निळसर पांढ-या रंगाची चकाकी दिसुन आली. त्याबाबतचे फोटो ग्राफस् घेण्यात आले. आम्ही तक्रारदार यांस लाप्रवि कार्यालय अहिल्यानगर येथे येणेबाबत सुचना दिल्या. सदर ठिकाणी पंचनाम्याचे कामकाज करणे सोयीचे नसल्याने आम्ही लोकसेवक चौधरी व मगर यांना सोबत घेवुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयात आलो. तत्पुर्वी आम्ही तक्रारदार यांस लाप्रवि कार्यालय अहिल्यानगर येथे येणेबाबत सुचना दिल्या. सदर ठिकाणी

पंचनाम्याचे कामकाज करण्यात आले.

तरी दिनांक 18/11/2025 रोजी 12/21 ते 12/49 वाजेच्या दरम्यान अहिल्यानगर शहरातील डी मार्ट समोर येथे तसेच दिनांक 19/11/2025 रोजी 12/16 ते 12/59 वाजेच्या दरम्यान पंचायत समिती कार्यालय पारनेर येथे लाचमागणी पडताळणी वेळी यातील लोकसेवक विलास नवनाथ चौधरी, वय 31 वर्षे, पद तांत्रीक सहायक(कंत्राटी), पंचायत समिती पारनेर, राह. कृष्णकुंज रोहौसिंग, घर नं. 3, लेखानगर, पाईपलाईनरोड अहिल्यानगर यांनी तक्रारदार श्री. अर्जुन बाळु कांदळकर यांचेकडे त्यांनी केलेल्या कामाचे बिले तयार करुन मंजुरी करीता पाठविण्याच्या मोबदल्यात डेप्युटी इंजिनिअर अजय विठ्ठल जगदाळे यांचेकरीता कामाचे एकुण बिलाचे टक्केवारी प्रमाणे 65,600/- रुपये लाचेची मागणी करुन लाच स्विकारण्याची तयारी दर्शविली आहे. दिनांक 20/11/2025 रोजी 12/06 वा ते 12/26 वाजेच्या दरम्यान लाचेच्या सापळा कारवाई वेळी लोकसेवक विलास नवनाथ चौधरी यांचे सांगण्यावरुन लोकसेवक दिनकर दत्तात्रय मगर, वय 26 वर्षे, पद तांत्रीक सहायक(कंत्राटी), पंचायत समिती पारनेर, राह. खांडगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर यांनी तक्रारदार यांचेकडुन लाचेची रक्कम 65,600/- रुपये स्विकारलेले आहे. तसेच लोकसेवक अजय विठ्ठल जगदाळे, उपअभियंता जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, श्रीगोंदा, अतिरिक्त कार्यभार जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम उपविभाग ता. पारनेर यांनी लोकसेवक चौधरी यांना तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम स्विकारण्यास प्रोत्साहन दिले आहे. लोकसेवक विलास नवनाथ चौधरी, दिनकर दत्तात्रय मगर, अजय विठ्ठल जगदाळे यांनी स्वतःच्या पदाचा व अधिकाराचा दुरुपयोग करुन स्वतःचा सांपत्तीक फायदा करुन घेण्याच्या हेतुन गुन्हेगारी गैरवर्तन केल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7, 12 प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.
तपासी अंमलदार - पोनि आर बी अल्हाट लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर मो.नं.9120896263

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
AANAND ASHOK KOKARE
**Rank (पद):** I (Inspector) **No.(क्र.):** DGPAAKM8102
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in Charge,**
**Police Station**
पोलीस ठाणे अंमलदार
पो.स्टे.अहिल्यानगर
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Jagdish Chhaburao E
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**